# निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय
## श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी लि., आजरा (मल्टी-स्टेट)

प्रधान कार्यालय : डॉक्टर्स कॉलनी, गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर
फोन: क्र. (०२३२७)-२२२४२५, २२२२४२ ई मेल : ravalnath.hogadhinglaj@gmail.com

## सर्व सभासदांकरिता नोटीस

ज्या अर्थी श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी लि., आजरा (मल्टी-स्टेट) ची संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणूक २०२५-२६ ते २०३०-३१, बहुराज्यीय सहकारी संस्थांचा कायदा २००२, त्याखालील नियम व संस्थेचे पोटनियम यास अनुसरून विशेष सर्वसाधारण सभा रविवार, दि.१४/१२/२०२५ रोजी घ्यावयाचे ठरले आहे. त्यानुसार दि. ३१/१०/२०२५ रोजीची श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी लि., आजरा (मल्टी-स्टेट) यांच्या सभासदांच्या खाली नमूद केल्याप्रमाणे दोन प्रकारच्या याद्या निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात व संस्थेच्या सर्व शाखांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत.

१) मतदानासाठी पात्र सभासदांची यादी
२) अपात्र सभासदांची यादी:-
  अ) थकबाकी असलेल्या सभासदांची यादी.
  ब) 'ॲक्टीव्ह' नसलेल्या सभासदांची यादी.
  क) संस्थेच्या आजी/माजी सेवक सभासदांची यादी.

संस्थेच्या सर्व सभासदांना सूचना देण्यात येते की, उपरोक्त नमूद क्र. १ व २ (अ, ब आणि क) मधील आपापली माहिती सभासदाने पहावी. वैयक्तिक माहिती संदर्भात किंवा सभासद यादीतील नाव व अन्य तपशीलासंबंधी काही तक्रार वा आक्षेप वा हरकती असल्यास त्या दि.११/११/२०२५ ते दि.१५/११/२०२५ पर्यंत स. ११.०० ते दु. ३.०० या वेळेतच निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे, त्यांचे उपरोक्त नमूद कार्यालयात लेखी स्वरूपात पुराव्यासह समक्ष अथवा वर नमुद ई-मेल द्वारे द्याव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही हरकती वा आक्षेप विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

## संचालक मंडळ निवडणूक सन २०२५-२६ ते २०३०-३१

१. निवडून द्यावयाच्या संचालकांची संख्या-१३ (सर्वसाधारण-१०, अनुसूचीत जाती/जमाती-०१ व महिला-०२)
२. संस्थेचे कार्यक्षेत्र - ०३ राज्य (महाराष्ट्र, कर्नाटक आणि दिल्ली)

| संचालक मंडळ निवडणूक कार्यक्रम | | | |
|---|---|---|---|
| अ. क्र. | बाब | दिनांक व वेळ | ठिकाण |
| १ | मतदानासाठी पात्र सदस्य/प्रतिनिधींच्या प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे. | दि.१०/११/२०२५ (सोमवार), सकाळी ११.०० वा. | संस्थेचे मुख्यालय आणि सर्व संस्था शाखा |
| २ | प्रारुप मतदार यादीवर हरकत/आक्षेप सादर करण्याचा कालावधी व वेळ | दि.११/११/२०२५ ते दि.१५/११/२०२५ (मंगळवार ते शनिवार), सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० पर्यंत, दररोज | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | प्रारुप मतदार यादीवर प्राप्त हरकत / आक्षेपांची छाननी करणे. | दि.१७/११/२०२५ ते दि.२१/११/२०२५ (सोमवार ते शुक्रवार), सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० पर्यंत, दररोज | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय |
| ४ | मतदानासाठी पात्र सदस्य / प्रतिनिधी यांची अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे. | दि.२२/११/२०२५ (शनिवार), सकाळी ११.०० वा. | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय / संस्थेचे मुख्यालय आणि सर्व शाखा |
| ५ | नामनिर्देशन पत्र विक्री आणि स्विकृत कालावधी | दि.२४/११/२०२५ ते दि.२९/११/२०२५ (सोमवार ते शनिवार), सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० पर्यंत, दररोज | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय |
| ६ | निवडणूक निर्णय अधिकारी यांना प्राप्त झालेल्या नामनिर्देशन पत्रांची यादी संस्थेच्या सूचना फलकावर प्रसिध्द करणे. | दि.२९/११/२०२५ (शनिवार), सायंकाळी ०५.०० वा. | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय |
| ७ | प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी करणे. | दि.०१/१२/२०२५ (सोमवार), सकाळी ११.०० पासून | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय |
| ८ | वैध नामनिर्देशन पत्रांची यादी प्रसिध्द करणे. | दि.०१/१२/२०२५ (सोमवार), सायंकाळी ०५.०० वा. | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय |
| ९ | नामनिर्देशन पत्र माघारी घेणेचा कालावधी व वेळ. | दि.०२/१२/२०२५ (मंगळवार), सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० पर्यंत | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय |
| १० | निवडणुकीस पात्र उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द करणे. | दि.०२/१२/२०२५ (मंगळवार), सायंकाळी ०५.०० वा. | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय |
| ११ | आवश्यक असल्यास मतदानाची तारीख व वेळ. | दि.१४/१२/२०२५ (रविवार), सकाळी ०८.०० ते सायं. ०४.०० पर्यंत आणि ज्यांनी दुपारी ०४.०० वाजता किंवा त्यापूर्वी मतदान केंद्रात प्रवेश केला असेल त्यांना मतदान करण्याची परवानगी राहील. | मतदान केंद्राचे नाव व ठिकाण स्वतंत्रपणे घोषित केले जाईल. |
| १२ | मतमोजणीची तारीख व वेळ | दि.१६/१२/२०२५ (मंगळवार), सकाळी ०८.०० पासून पुढे | मतमोजणीचे ठिकाण स्वतंत्रपणे घोषित केले जाईल. |
| १२ अ | संचालक मंडळाचा निकाल जाहीर करण्यापूर्वी सहकारी | दि.१६/१२/२०२५ (मंगळवार) | |

| | | | |
|---|---|---|---|
| | निवडणूक प्राधिकरणाची मान्यता मिळविण्यासाठी शिफारसीसह फॉर्म 19M सादर करणे. | | |
| १३ | निवडणुकीचा निकाल घोषित करणे. | दि.१९/१२/२०२५ (शुक्रवार), सहकारी निवडणूक प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या मान्यतेनंतर नमुना 19M मध्ये | संस्थेचे मुख्यालय |
| | **पदाधिकारी निवडीचा निवडणूक कार्यक्रम** | | |
| १४ | निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर करणे | दि.२२/१२/२०२५ (सोमवार), संचालक मंडळ सदस्य निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर | संस्थेचे मुख्यालय |
| | १. नामनिर्देशन पत्र सादर करणे | | |
| | २. प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी करणे. | | |
| | ३. नामनिर्देशन पत्र माघारी घेणे | | |
| | ४. प्राप्त नामनिर्देशन अर्जांची यादी प्रसिद्ध करणे | | |
| १५ | नव्याने स्थापन केलेल्या संचालक मंडळाची बैठक आणि वैध नामांकन, मतदान (आवश्यक असल्यास) यादी प्रसिद्धी करणे. | दि.२४/१२/२०२५ (बुधवार), सकाळी ११.०० पासून पुढे | संस्थेचे मुख्यालय |
| १६ | पदाधिकारी निवडीचा निकाल जाहीर करणे. | सहकारी निवडणूक प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या मान्यतेनंतर नमुना 19N मध्ये | संस्थेचे मुख्यालय |

Digitally signed by
Amol Jagannath Yedage
Date: 07-11-2025
16:17:04

**(श्री. अमोल येडगे भा. प्र. से.)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स**
**सोसायटी लि., आजरा (मल्टी-स्टेट)**
**तथा**
**जिल्हाधिकारी, कोल्हापूर**

**ठिकाण : गडहिंग्लज**
**दिनांक : १०/११/२०२५**